ePaper


## सुप्रिया सुळे “फेक नरेटिव्ह कंपनीच्या डायरेक्टर”: रुपाली चाकणकर



‖ वर्ष - 8 I अंक -140 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 28 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- गुकेशने डिंगला बरोबरीत रोखले!
- बुमराह नंबर वन कसोटी गोलंदाज!
- ‘माय पार्टी अँड माय फादर’!
- नवीन वर्षात सर्वनाश होणार!


### देवेंद्र फडणवीस पुन्हा येणार की भाजप धक्कातंत्र वापरणार?

# दिल्लीत ठरणार महाराष्ट्राचा मुख्यमंत्री!

## एकनाथ शिंदेंनी दावा सोडल्यामुळे भाजपचा मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा

I मुंबई I महाईन्यूज

**महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार? चार दिवसांपासून महायुतीला या प्रश्नाचं उत्तर अद्याप मिळालेलं नाही. एकनाथ शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली. एकनाथ शिंदेंनी दावा सोडल्यामुळे भाजपचा मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा झाला. पण मुख्यमंत्री कोण होणार? हे अद्याप ठरलेलं नाही. देवेंद्र फडणवीस पुन्हा येणार? की भाजप धक्कातंत्र वापरणार? याची उलटसुलट चर्चा सुरु झाल्या आहेत.**



### शिंदे यांना मिळणार अर्थ आणि गृहखाते

विधानसभेच्या निवडणुकीमध्ये महायुतीला मोठे यश मिळाले. राज्यात सर्वात मोठा पक्ष भाजपा ठरलाय. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यामध्ये मुख्यमंत्रीपदासाठी रस्सीखेच सुरू असल्याची सातत्याने चर्चा रंगताना दिसली. शेवटी एकनाथ शिंदे यांच्याकडून या सर्व चर्चांना पुर्णविराम देण्यात आले. एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्री होण्याच्या मार्ग मोकळा केला. आता हे स्पष्ट आहे की, मुख्यमंत्री भाजपाचाच होणार. लवकरच राज्यात सरकार स्थापन होईल. देवेंद्र फडणवीस हेच राज्याचे नवीन मुख्यमंत्री असल्याचे जवळपास स्पष्ट आहे.

यादरम्यान सर्वांनाच प्रश्न पडलाय की, नवीन सरकारमध्ये एकनाथ शिंदे यांची भूमिका नेमकी काय असेल. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाल्यानंतर एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारणार का?. मुळात म्हणजे यादरम्यान अजित पवार यांची देखील भूमिका महत्वाची असणार आहे. अनुभवात अजित पवार हे एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्याही पुढे असल्याची वस्तुस्थिती आहे. अजित पवार हे पाच वेळा उपमुख्यमंत्री राहिले आहेत.

गृहमंत्रालय देवेंद्र फडणवीस हे स्वत:कडेच ठेवतील अशी चर्चा आहे. शिंदे मुख्यमंत्री असतानाही गृहखाते देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच होते. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार या तीन महायुतीच्या नेत्यांपैकी दादांना सरकारचा सर्वाधिक अनुभव आहे. अजित पवार उपमुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी त्यांचे आवडते अर्थ मंत्रालय स्वत:कडे घेतले. यामुळे अर्ज मंत्रालय याच्यावर अजित पवार यांचा दावा असेल तर देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखाते.

मंत्रीमंडळात एकनाथ शिंदे यांना नेमके कोणते खाते मिळणार यावर आता जोरदार चर्चा आहे. कारण दोन्ही महत्वाची खाती अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असण्याची शक्यता आहे. मुळात म्हणजे लाडकी बहिण योजनेचा फायदा महायुती सरकारला झाला. महायुतीच्या नेत्यांनी पत्रकार परिषदेमध्येही लाडक्या बहिणींचे आभार मानले. आता कोण मुख्यमंत्री होते आणि कोणाला कोणती खाती मिळतात, याकडे सर्वांच्या नजरा आहेत. लवकरच याबद्दल निर्णय होऊ शकतो.

### तिन्ही नेत्यांची अमित शाह यांच्यासोबत चर्चा

आज अजित पवार, एकनाथ शिंदे आणि भाजपाच्या सर्वोच्च नेत्यांची दिल्लीत बैठक होणार आहे. या बैठकीनंतर महाराष्ट्राची काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे त्यांच्या पक्षाच्या सर्व खासदारांना दिल्लीत भेटणार आहेत. दिल्लीमध्ये अधिवेशन सुरू असल्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे सर्व खासदार आज दिल्लीत आहेत. एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या सर्व खासदारांना आज दिल्लीत उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. आज अजित पवार, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस अमित शाह यांची भेट घेणार आहे. या बैठकीत मंत्रिपदावर चर्चा होण्याची शक्यता आहे.

### तावडे-अमित शाह यांच्यामध्ये खलबते

महाराष्ट्रातील नेत्यांसोबत होणाऱ्या बैठकीच्या आधी अमित शाह यांनी विनोद तावडे यांना भेटीसाठी बोलवालं होतं. दोन्ही नेत्यांमध्ये दीर्घ चर्चा झाल्याचे समजतेय. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदासंदर्भात विनोद तावडे आणि अमित शाह यांच्यात चर्चा झाल्याची माहिती मिळाली आहे. राज्यातील परिस्थिती पाहता मुख्यमंत्री कोण असावा यावर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. त्याशिवाय आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींविषयी देखील भेटीत चर्चा झाली.

### फडणवीसांच्या नावावर मोठा विक्रम

भाजपकडून मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्यास वेगळा इतिहासच होणार आहे. कारण महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात आतापर्यंत उपमुख्यमंत्री राहिलेला व्यक्ती मुख्यमंत्री झालेला नाही. देवेंद्र फडणवीस २०१४ ते २०१९ या काळात मुख्यमंत्री होते. त्यानंतर महायुतीच्या काळात २०२२ ते २०२४ या काळात देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. आता जर त्यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाली, तर हे ऐतिहासिकच असेल.

### ...की भाजपचे धक्कातंत्र

महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार? हे २४ तासांच्या आत स्पष्ट होण्याची शक्यता आहे. भाजप आणि राष्ट्रवादीच्या १७८ आमदारांचे देवेंद्र फडणवीस यांना पाठबळ आहेच. पण भाजप धक्कातंत्रामध्ये तरबेज आहे. राजस्थान आणि हरियाणामध्ये भाजपने मुख्यमंत्रीपदासाठी नवख्या चेहऱ्यांना संधी दिली होती. आता महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात भाजप सत्तेची चावी कुणाच्या हाती देणार? याची चर्चा सुरु झाली आहे. मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे. मुख्यमंत्रिपदाबाबत आज अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. २४ तासांत महाराष्ट्राचा बॉस कोण होणार? यावरुन पडदा उठणार आहे.

### महायुतीच्या नेत्यांची शाहांसोबत बैठक

महाराष्ट्रात भाजपचा मुख्यमंत्री असणार असल्याचं आता जवळपास निश्चित झालं आहे. अमित शाह यांच्यासोबतच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांचं नाव जाहीर होण्याची शक्यता आहे.

# मनसेची पुण्यात होणार 'आत्मचिंतन' बैठक

## निवडणुकीमध्ये मनसेने महायुतीला जाहीर पाठिंबा दिला होता

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र नवनिर्माणाची स्वप्ने पाहणाऱ्या मनसेला विधानसभा निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. २८८ पैकी १२८ जागा लढविलेल्या मनसेला एकही जागा जिंकता आली नाही. पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे हे देखील विधानसभेच्या मैदानात उतरले होते, मात्र मतदारांनी नाकारल्याने त्यांनाही पराभवाचा धक्का सहन करावा लागला.**



निवडणुकीत उतरविले होते, मात्र तेथेही त्यांना पराभव स्वीकारावा लागला. या पार्श्वभूमीवर पक्षाला आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांना, पदाधिकाऱ्यांना नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न आता पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सुरू केला आहे.सहा महिन्यापूर्वी झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये अखेरच्या टप्प्यात मनसेने महायुतीला जाहीर पाठिंबा दिला होता. बिनशर्त हा पाठिंबा असल्याचे पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपल्या सभेत जाहीर केले होते. लोकसभेला महायुतीला पाठिंबा दिलेल्या मनसेला विधानसभेच्या निवडणुकीत भाजप तसेच महायुतीत मित्र पक्ष असलेल्या शिवसेना (शिंदे) तसेच राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाकडून मदत केली जाईल, असे वाटत होते.

विधानसभेच्या निवडणुकीत प्रत्येक पक्ष आपल्या वाट्याच्या काही जागा मनसेला देऊन लोकसभेच्या निवडणुकीत दिलेल्या पाठिंब्याची परतफेड करेल, असा विश्वास मनसे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना होता. मात्र भाजपसह महायुतीने मनसेला शेवटपर्यंत खेळवत ठेवले.महायुतीत सहभागी होऊन निवडणूक लढवली जाईल, या भ्रमात पक्षाचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते राहिले. त्यामुळे निवडणुकीची फारशी तयारी झाली नाही. याचा फटका विधानसभा निवडणुकीत बसला. या निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा एकही उमेदवार निवडून आलेला नाही. पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबईत काही ठिकाणी मनसेचे उमेदवार निवडून येण्याची अपेक्षा पक्षाला होती. मात्र एकही जागा मनसेला मिळाली नाही. निवडणुकीत पक्षाची वाताहात झाली असून , कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास ढळला आहे. या पार्श्वभूमीवर पराभवाचे आत्मचिंतन करण्यासाठी पुण्यात बैठक बोलवण्यात आली आहे. पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या उपस्थितीत ही बैठक उद्या ( गुरुवारी) होणार आहे. पक्षाच्या कार्यालयात ही बैठक होण्याची शक्यता असून पुणे शहरातील तसेच पश्चिम महाराष्ट्रातील मनसेचे पराभूत उमेदवार आणि पक्षाचे पदाधिकारी हे या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. राज ठाकरे त्यांच्याशी संवाद साधणार आहेत.विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबई आणि ठाण्यातील पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन चर्चा केली होती. त्या पाठोपाठ आता पुणे शहर आणि पश्चिम महाराष्ट्रातील विविध मतदारसंघातील मनसेचे पराभूत उमेदवार, स्थानिक पदाधिकाऱ्यांशी राज ठाकरे संवाद साधणार असून त्यांचे म्हणणे ऐकून घेणार आहेत.

### कठोर भूमिका घेऊन निर्णय घ्यावे

लोकसभेला भाजपला जाहीर पाठींबा दिलेल्या मनसेने विधानसभा निवडणुकीसाठी चार उमेदवार उभे केले होते. पुणे शहरातील कोथरूड, खडकवासला, हडपसर आणि कसबा मतदारसंघात मनसेने उमेदवार उभे केले होते. या उमेदवारांच्या प्रचारासाठी ठाकरे यांनी दोन वेळा जाहीर सभा देखील घेतल्या होत्या. मात्र त्याचा फारसा परिणाम झालेला दिसला नाही. सर्वच ठिकाणी मनसेच्या उमेदवारांना पराभवाचा समाना करावा लागला आहे. काही मतदारसंघांत चांगली मते मिळाली आहेत. पुढील काही महिन्यात राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची तयारी राज्यात सत्ताधारी होणाऱ्या महायुतीच्या नेत्यांनी सुरू केली आहे. या निवडणुकांना सामोरे जायचे असेल तर मनसेला पक्ष पातळीवर काही कठोर भूमिका घेऊन तातडीने निर्णय घ्यावे लागणार आहेत.

# नगर, पुण्यात थंडीच्या लाटेची शक्यता

## उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचा झंझावात असल्यामुळे गारठा वाढला

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे उत्तर महाराष्ट्र आणि मध्य महाराष्ट्रात पारा नऊ अंशांपर्यंत खाली आला आहे. बुधवारी (२७ नोव्हेंबर)नगरमध्ये राज्यात सर्वांत कमी ९.४ तर पुण्यात ९.९ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे.**



पुढील दोन दिवसांत नाशिक, नगर, पुण्यात थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचा झंझावात वेगाने राज्यात येत असल्यामुळे राज्यात गारठा वाढला आहे. बुधवारी नगरमध्ये सर्वांत कमी ९.४ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. त्या खालोखाल पुण्यात ९.९, जळगाव ११.०, सातारा १२.०, औरंगाबाद १२.२, परभणी ११.६, नागपूर ११.७, गोंदिया ११.९ आणि अकोल्यात १३.६ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे.पुढील दोन दिवसांत नाशिक, नगर, पुण्यात थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचा झंझावात वेगाने राज्यात येत असल्यामुळे राज्यात गारठा वाढला आहे. बुधवारी नगरमध्ये सर्वांत कमी ९.४ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. त्या खालोखाल पुण्यात ९.९, जळगाव ११.०, सातारा १२.०, औरंगाबाद १२.२, परभणी ११.६, नागपूर ११.७, गोंदिया ११.९ आणि अकोल्यात १३.६ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे.पुणे शहरातील कमाल आणि किमान तापमानात घट होत असल्याने थंडीचा जोर वाढला आहे. यंदाच्या हंगामात पहिल्यांदाच दहा अंश सेल्सियसपेक्षा कमी तापमानाची नोंद झाली असून, थंडीमुळे रात्रीबरोबर दिवसाही हुडहुडी जाणवू लागली आहे. पुढील काही दिवस तापमानात घट होत राहणार असल्याचा अंदाज हवामानतज्ज्ञांनी वर्तवला आहे.

### थंडीमुळे पुण्यात हुडहुडी

उत्तरेकडील थंड वाऱ्याचा जोर आणखी दोन दिवस कायम राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, नगर आणि मध्य महाराष्ट्रातील पुण्यात पुढील दोन दिवसांत थंडीची लाट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्या नंतर बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या वादळामुळे राज्यात बाष्पयुक्त हवा येऊन थंडी काही प्रमाणात कमी होण्याचा अंदाज आहे. पण, सध्यातरी पुढील दोन दिवस थंडीत काहिशी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी व्यक्त केली आहे.

## POLITICAL ANALYSIS: भोसरी विधानसभा मतदार संघ

# भोसरीत सोसायटीधारक, उच्चशिक्षित “किंगमेकर”!

- विधानसभा निवडणुकीत महेश लांडगे यांच्या पारड्यात मते
- मुस्लिमबहुल भागातही महायुतीला मिळाले बरोबरीत मतदान

। पिंपरी-चिंचवड । विशेष प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाविकास आघाडी आणि स्थानिक नेत्यांनी अत्यंत प्रतिष्ठेची केलेल्या भोसरी विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत सोसायटीधारक आणि उच्चशिक्षित मतदारांनी महायुतीच्या पारड्यात मतदान टाकलेले आहे. त्यामुळे आमदार महेश लांडगे यांचा विजय सोपा झाला. विशेष म्हणजे, झोपडपट्टी व मुस्लिमबहुल मतपेट्यांमध्ये लोकसभा निवडणुकीप्रमाणेच महाविकास आघाडीला एकतर्फी मते मिळतील, असा दावा केला जात होता. मात्र, या मतपेट्यांमध्ये महायुती-महाविकास आघाडीला बरोबरीत मते मिळाली आहेत.**




आमदार महेश लांडगे यांनी विकासाच्या मुद्यावर आणि भविष्यात काय करणार या ‘व्हीजन’बाबत लोकांशी संवाद केला. कोणताही आरोप-प्रत्यारोप न करता ही निवडणूक संयमाने आणि नियोजनबद्ध लढवली. त्याचबरोबत हिंदूत्ववादी भूमिका कदापि सोडली नाही. याउलट, अजित गव्हाणे यांनी दहशत, दडपशाही आणि भ्रष्टाचार अशी चिखलफेक केली. उच्चशिक्षित, सुशिक्षित मतदार आणि सोसायटीधारकांमधील संवेदशनील मतदारांना हा प्रचार रुचला नाही. त्यामुळे लांडगे यांना मताधिक्य मिळाले, असे निरीक्षण राजकीय जाणकार नोंदवतात. भोसरी विधानसभा मतदार संघात एकूण ६१.१४ टक्के मतदान झाले. एकूण ६ लाख ८ हजार ४२५ मतदार आहेत. त्यापैकी ३ लाख २८ हजार २८० पुरुष तर २ लाख ८ हजार ४८ महिला तर अन्य ९७ मतदार आहेत. या निवडणुकीत एकूण ३ लाख ७५ हजार ४०४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. आमदार महेश लांडगे यांना २ लाख १३ हजार ६२४ मते मिळाली आहेत, तर अजित गव्हाणे यांना १ लाख ४९ हजार ८५९ मते आहेत. तब्बल ६३ हजार ७६५ मताधिक्याने महेश लांडगे विजयी झाले आहेत.

### फतवा विरुद्ध भगवा...

महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून महेश लांडगे यांच्या प्रखर हिंदूत्ववादी भूमिकेला ‘टार्गेट’ करण्यात आले. तसेच, संविधान भवनाच्या जनजागृती फ्लेक्सवरील कथित स्वाक्षरीवरुन ‘ फेक नॅरेटिव्ह’ करण्याचा प्रयत्न केला. मातब्बर नेते माजी महापौर आझम पानसरे यांनी मुस्लिम संघटनांना एकत्र करीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी मेळावा घेतला आणि जाहीर पाठींबा दिला. तसेच, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी चिखलीतील जाहीर ‘व्होट जिहाद’चे समर्थन केले. त्याद्वारे मुस्लिम व अल्पसंख्याक मतांचे ध्रुवीकरण होईल, असा कयास होता.

मुस्लिम बहुल भाग आणि झोपडपट्टी, बैठी घरे भागात अजित गव्हाणे यांना चांगली मते मिळालेली आहेत. मात्र, अपेक्षीत असलेले एकतर्फी लीड मिळालेले नाही. ‘फतवा विरुद्ध भगवा’ असा संदेश तळागाळात पोहोचला आणि महेश लांडगे यांच्यापाठीमागे हिंदू समाजाने जातीभेद विसरुन मतदान केले. ‘माझं हिंदूत्व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांनुसार, आठरापगड जाती, बाराबलुतेदारांचे हिंदुत्व आहे”, या महेश लांडगे यांच्या भूमिकेला मतदारांनी साथ दिली.



### मातब्बरांच्या प्रभागातील मविआची पिछेहाट...

आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्त्वावर आणि कार्यपद्धतीवर आरोप करीत सहा नगरसेवकांनी भाजपाला निवडणुकीपूर्वीच सोडचिठ्ठी दिली होती. महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या सुमारे ४० जणांनी ही निवडणूक वैयक्तिक पातळीवर म्हणजे स्वत: उमेदवार असल्याप्रमाणे लढवली. आपआपल्या प्रभागात प्रचंड प्रचार आणि नियोजन केले आणि महेश लांडगे यांना चौफेर टीका-टीपण्णी केली. तळवडे-रुपीनगरमधून माजी नगरसेवक पंकज भालेकर यांनी थेट आरोप करीत प्रसारमाध्यमांमध्ये हवा केली. मोशीमध्ये माजी नगरसेवक वसंत बोराटे, शिवसेनेचे धनंजय आल्हाट, परशुराम आल्हाट यांनी उठाव केला. चऱ्होलीतून विनया तापकीर, कुणाल तापकीर यांनी अक्षरश: रान पेटवले. चिखली आणि घरकुल परिसरातून माजी नगरसेवक संजय नेवाळे, विष्णुपंत नेवाळे, यश साने, विकास साने या मंडळींनी ताकदीने काम केले. नेहरुनगर प्रभागातून माजी नगरसेवक राहुल भोसले, माजी महापौर वैशाली घोडेकर यांनी मोठी मोर्चेबांधणी केली होती. इंद्रायणीनगर आणि सभोवतालच्या भागात माजी स्थायी समिती सभापती सीमा सावळे, माजी नगरसेवक संजय वाबळे, विक्रांत लांडे यांच्यासह तुषार सहाणे, संजय उदावंत यांनी तगडे आव्हान दिले होते. भोसरी गावठाण भागात माजी नगरसेविका सारिका लांडगे, भीमाबाई फुगे, जालिंदर शिंदे यांच्यासह रवि लांडगे यांनी आमदार महेश लांडगे यांना खिंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. निगडीमध्ये माजी नगरसेवक सुमन पवळे, धनाजी खाडे, शुभांगी बोऱ्हाडे यांनी प्रखर विरोध केला. मात्र, अपवादात्मक तीन-चार बूथ वगळता महेश लांडगे यांना मताधिक्य राहिले आहे.

### ‘होमपिच’वर अजित गव्हाणे यांना फटका...

गेल्या २० वर्षांपासून ज्या प्रभागाचे प्रतिनिधीत्व अजित गव्हाणे करीत होते. संत तुकारामनगर, गुरुदत्त कॉलनी, गंगोत्री पार्क, सावंतनगर, महादेवनगर, गवळीनगर, श्रीराम कॉलनी, संत ज्ञानेश्वरनगर, शास्त्री चौक, जय महाराष्ट्र चौक, हुतात्मा चौक, रामनगरी सोसायटी या भागात अजित गव्हाणे पिछाडीवर आहेत. महाविकास आघाडीच्या विचाराने लढणारे तीन माजी नगरसेवक या प्रभागातून महेश लांडगे यांना आव्हान देवू शकले नाहीत. माजी नगरसेविका प्रियांका बारसे आणि अनुराधा गोफणे यांनी पूर्ण ताकद लावली. २० वर्षे प्रभागात प्रतिनिधीत्व करीत असतानाही गव्हाणे यांना या प्रभागात वर्चस्व ठेवता आले नाही. ‘फेक नॅरेटिव्ह’ चा प्रयत्न आणि विकासाच्या मुद्यांकडे झालेले दुर्लक्ष यामुळे गव्हाणे यांना आमदारकी किंवा विधानसभेसाठी लोकांनी स्विकारले नाही, असेही निरीक्षण राजकीय जाणकार नोंदवतात.



## भूमिका

**आपल्या संविधानाचे सार सांगणाऱ्या प्रास्ताविकेची सुरुवात ‘आम्ही, भारताचे लोक, भारताचे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा ...(निर्धार करतो)’ अशी आहे. यापैकी केवळ ‘आणीबाणीच्या कालखंडात घुसडले गेलेले शब्द’ म्हणून ‘समाजवादी’ आणि ‘धर्मनिरपेक्ष’ या शब्दांचा दुस्वास करणाऱ्यांची संख्या मोठी आहे.**

# ‘समाजवादी, धर्मनिरपेक्ष’ की ‘पंथ’निरपेक्ष?

विशेषत: प्रास्ताविकेच्या अखेरीस भारताच्या लोकांनी हे संविधान अंगीकृत, अधिनियमित आणि स्वत:ला अर्पण करण्याची तारीख – २६ नोव्हेंबर १९४९ – स्पष्टपणे नमूद असल्याने त्यानंतरचा बदल अवैधच ठरवायला हवा, असे काहीजणांचे म्हणणे असते. साक्षात नानी पालखीवालांसारख्या विधिज्ञांच्या युक्तिवादानंतरही हे शब्द कायम राहिल्याची खदखदही अनेकांमध्ये असते. या दुस्वासाला, खदखदीला आणि त्यामागच्या आक्षेपांना वाट देणाऱ्या तीन याचिका २०२० पासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित होत्या, त्या न्यायालयाने फेटाळल्या. म्हणजे हे शब्द यापुढेही कायमच राहतील, असे न्यायालयाने बजावले आहे. बहुतेक राज्यांच्या विधानसभा बरखास्त असताना (आणीबाणीमध्ये) संसदेत ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे हे शब्द प्रास्ताविकेत समाविष्ट झाले, हे खरे. पण त्यानंतरच्या ‘जनता पक्ष’ सरकारने ४२ व्या घटनादुरुस्तीला



निष्प्रभ करण्यासाठी जी ‘४५ वी घटनादुरुस्ती’ मांडली, तिच्यावरील चर्चेअंती हे शब्द कायम ठेवण्याचा निर्णय जनता सरकारनेही घेतला, हा इतिहास सर्वोच्च न्यायालयाने सांगितला, हे बरे झाले. ‘भारतीय संदर्भात समाजवादाचा अर्थ ‘कल्याणकारी राज्य’ इतकाच आहे’ आणि ‘धर्मनिरपेक्षता हा संविधानाच्या पायाभूत चौकटीचा भाग असल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती (१९७३), एस. आर. बोम्मई (१९९४) या प्रकरणांच्या निकालांत, तसेच त्यानंतरही वेळोवेळी व्यक्त केलेले आहे. भारतीय संदर्भात धर्मनिरपेक्षता या संकल्पनेची व्याप्ती फार मोठी आहे- राज्ययंत्रणा कोणत्याही एका धर्माची नाही, पण सर्व नागरिकांना आपापला धर्म आचरण्याचे आणि त्याचा प्रसार करण्याचेही स्वातंत्र्य आहे’ — हेसुद्धा न्यायालयाने स्पष्ट केले. इतक्या साधार विवेचनानंतर यापुढे तरी कुणी प्रास्ताविकेत ‘धर्मनिरपेक्षता घुसवल्या’ची तणतण करणार नाही, ही अपेक्षा प्रशस्त झाली आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्या. संजय कुमार यांनी २५ नोव्हेंबरला- म्हणजे संविधान दिनाच्या पूर्वसंध्येला प्रास्ताविकेचे मूल्य-भान विशद केले, हे योग्यच झाले. पण न्यायपालिकेलाही न जुमानता जे राजकारण करू इच्छितात, त्यांचे काय करायचे हा प्रश्न यापुढेही बहुधा कायम राहील. याचे प्रत्यंतर लगेच मंगळवारी आले.भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सवी सोहळा राष्ट्रपतींच्या भाषणाने जुन्या संसद भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात मंगळवारी पार पडला. राष्ट्रपतींनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे जाहीर वाचन साऱ्या सभाजनांकडून करवून घेतले. पण प्रास्ताविकेतील ‘धर्मनिरपेक्ष’ या शब्दाऐवजी महामहीम राष्ट्रपतींनी ‘पंथ...’ असा उच्चार केल्याचे स्पष्ट ऐकू आले! या वेळच्या भाषणात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ‘नागरिकांची मूलभूत कर्तव्ये’ यावरही भर दिला. ‘मूलभूत कर्तव्ये’ (विभाग ४ अ, अनुच्छेद ५१ अ) हा भागसुद्धा आणीबाणीतल्या ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारेच संविधानात समाविष्ट झाला होता; परंतु खरे आश्चर्य ‘पंथ’ या शब्दाचे- कारण त्या शब्दामागचा राजकारणाचा आणि वादग्रस्त इतिहास फार जुना नाही! २६ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी ‘संविधान दिन’ म्हणून पाळण्याचा, त्यासाठी संसदेतही खास सोहळे करण्याचा निर्णय मात्र २०१५ पासून भाजपच्या सरकारने अमलात आणला. त्यासाठी २०१५ मध्ये तर, दोन दिवसांचे खास अधिवेशनही झाले होते. नेमके याच अधिवेशनात ज्येष्ठ भाजपनेते आणि केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी ‘प्रास्ताविकेत ‘समाजवादी’ आणि ‘सेक्युलर’ हे शब्द नंतर घुसडले गेलेले आहेत.‘२०१५ च्या त्या अधिवेशनातच, तेव्हा काँग्रेसचे अध्यक्ष नसलेल्या मल्लिकार्जुन खरगे यांनी सिंह यांना प्रत्युत्तरही दिले होते, पण ‘मीडिया’ने लोकांपर्यंत चोखपणे पोहोचवली ती, सिंह यांची ‘सेक्युलर’ या शब्दावरची नाराजी. या शब्दाचा हिंदी अर्थ ‘पंथनिरपेक्षता’ असल्याचेही राजनाथ सिंह म्हणत होते.

## प्रासंगिक »

### ‘एनजीओ’गिरी सोडा


***राहुल गांधी ते नाना पटोले यांच्या वर्तनाने काँग्रेसची पडझड झालीच; त्याहीपेक्षा भाजपच्या लोकसभेतील पीछेहाटीलाच आपला विजय मानणे नडले...***

विधानसभा निवडणुकांत शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना या पक्षांचे मोठे नुकसान संख्यात्मकदृष्ट्या झाले. काँग्रेसचे तसे नाही. संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही पातळ्यांवर त्या पक्षाची कामगिरी निराशाजनक झाली. संख्येत तर त्या पक्षाने मार खाल्लाच. पण त्याच वेळी पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, यशोमती ठाकूर आदी ज्येष्ठ, अनुभवी आणि अभ्यासू काँग्रेस नेत्यांस या निवडणुकीत पराभव चाखावा लागला. अवघ्या चार महिन्यांपूर्वी झालेल्या निवडणुकांत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांच्या ‘महाविकास आघाडी’ने घवघवीत यश नोंदवले. त्या वेळी भाजप, अजितदादांची राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्या सत्ताधारी महायुतीपेक्षा विरोधकांच्या महाविकास आघाडीचा विजय दर लक्षणीय होता.

जनता पक्षाच्या आघाडीचे सरकार १९७७ साली अस्तित्वात आले. इंदिरा गांधींच्या काँग्रेसला त्यांनी मोठा शह दिला; मात्र पूर्ण पाच वर्षे हे सरकार टिकू शकले नाही. सरकार चालवण्यात आणि दीर्घ पल्ल्याची धोरणे आखण्यात त्यांना अपयश आले असले तरी त्यांनी एक महत्त्वपूर्ण घटनादुरुस्ती त्यांच्या कार्यकाळात केली.

# पुन्हा लोकशाहीच्या वळणावर

ही संविधानातील ४४ वी घटनादुरुस्ती. ही घटनादुरुस्ती केली गेली ती ४२ व्या घटनादुरुस्तीला उत्तर म्हणून. संविधानातील ४२ व्या घटनादुरुस्तीमुळे मूलभूत हक्कांना धक्का लागला होता, न्यायालयांचे अधिकारक्षेत्र कमी झाले होते, मुख्य म्हणजे आणीबाणीमुळे संस्थात्मक हानी झालेली. हे सारे बदलण्यासाठी जनता पक्षाच्या आघाडीने ४४ वी घटनादुरुस्ती मंजूर केली.सर्वांत महत्त्वाचा बदल या दुरुस्तीने केला तो आणीबाणीबाबत. देशांतर्गत अशांतता हे आणीबाणी जाहीर करण्यासाठीचे एक कारण ३५२ व्या अनुच्छेदात होते. हे कारण या दुरुस्तीनुसार रद्द करण्यात आले. सशस्त्र उठाव असल्यास आणीबाणी लागू करता येऊ शकेल; मात्र देशांतर्गत अशांतता निर्माण झाली आहे, या आधारावर नव्हे. तसेच कॅबिनेटने लिखित स्वरूपात आणीबाणीसाठीचा सल्ला दिल्यावरच राष्ट्रपतींना आणीबाणी घोषित करता येईल, असा बदल या दुरुस्तीद्वारे केला गेला. तसेच आणीबाणीचा प्रस्ताव दोन्ही



सभागृहांनी विशेष बहुमताने पारित करणे आवश्यक आहे, हा महत्त्वपूर्ण बदल केला. म्हणजेच अगदी सहज केवळ पंतप्रधानांच्या मर्जीवर आणीबाणीचा निर्णय होऊ नये, यासाठी या तरतुदी केल्या गेल्या. अगदी राज्यांमध्ये लागू केल्या जाणाऱ्या राष्ट्रपती राजवटीसाठीही काही प्रक्रियात्मक बदल या दुरुस्तीद्वारे केला गेला.आणीबाणीच्या काळात सर्व मूलभूत हक्क निलंबित केले जातात. या दुरुस्तीने त्यामध्ये अनुच्छेद २० आणि २१ चा अपवाद जोडला. म्हणजेच अटकेपासून संरक्षणाचा हक्क आणि जगण्याचा हक्क हे हक्क आणीबाणीच्या काळातही निलंबित केले जाणार नाहीत, हा महत्त्वाचा बदल केला गेला. या आणि इतर मूलभूत हक्कांचे रक्षण करतानाच संपत्तीचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून रद्द केला. त्यामुळे तो केवळ कायदेशीर हक्क उरला. वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिकांना विधिमंडळांच्या प्रक्रियेबाबत वृत्तांकन करण्याचे स्वातंत्र्य मान्य केले गेले आणि त्यासाठी त्यांना कायदेशीर संरक्षण दिले गेले. आणीबाणीच्या काळात माध्यमांच्या स्वातंत्र्यावरच गदा आल्याने ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार हा बदल केला गेला. आणीबाणीचे न्यायिक पुनर्विलोकन होऊ शकते. तसेच पंतप्रधान, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकांना न्यायालयात आव्हान देता येऊ शकते. हे आणि या प्रकारचे बदल करत न्यायसंस्थेला त्यांचा मूळ अधिकार या घटनादुरुस्तीने मान्य करून दिला.त्यामुळे आणीबाणीची प्रक्रिया, मूलभूत हक्क आणि न्यायालयांची अधिकारकक्षा या अनुषंगाने मूलभूत बदल करून ४४ व्या घटनादुरुस्तीने सत्तेचे केंद्रीकरण टाळत देशाची गाडी लोकशाही हमरस्त्याला आणण्याचा प्रयत्न केला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राज्यात 1 मुख्यमंत्री आणि 2 उपमुख्यमंत्री!

## शिंदे, फडणवीस, पवार तिनही नेत्यांची दिल्लीत बैठक

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मोठं बहुमत मिळालं. मात्र, महाविकास आघाडीला मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागलं. दरम्यान, या निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या यशानंतर राज्यात महायुतीचं सरकार लवकरच स्थापन होईल. सरकार स्थापन करण्यासाठी महायुतीच्या नेत्यांमध्ये हालचाली सुरु आहेत. यावर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार अशा तिनही नेत्यांची दिल्लीत महत्वाची बैठक ठरणार असल्याची माहिती अजित पवारांनी सांगितली आहे. तसेच महायुतीच्या सरकारचा फॉर्म्युला कसा असेल? यावर भाष्य केलं आहे. एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री असतील असंही अजित पवारांनी सांगितलं.**



“आता आमची जबाबदारी वाढलेली आहे. आम्ही उद्या तिघेही दिल्लीत जाणार आहोत. त्यानंतर दिल्लीत पुढची चर्चा होईल. त्यानंतर एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री असं सरकार स्थापन होईल. आता काही दिवसांतच लगेच नागपूरच अधिवेशन आहे. त्यामुळे पुरवणी मागण्या मंजूर करुन घ्याव्या लागतील. कामाचा प्रेशर राहील. पण आम्ही अनुभवी असल्यामुळे काही अडचण येणार नाही. राज्याचा विकास करण्याचा प्रयत्न आमचा आहे. तसेच समाजातील सर्व घटकांना बरोबर नेण्याचा प्रयत्न आमचा आहे. केंद्र सरकारकडून राज्यासाठी निधी आणण्याचा प्रयत्नही आमचा आहे”, असं अजित पवार यांनी म्हटलं.“उद्या दिल्लीत गेल्यानंतर त्या ठिकाणी लोकसभेचं अधिवेशन सुरु आहे. त्यामुळे तिथे प्रमुखांना भेटण्याचाही प्रयत्न आमचा असेल. तसेच महायुतीच्या सरकार स्थापनेबाबतची चर्चा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात होईल. त्यामध्ये मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ असं ठरेल आणि त्याला अंतिम स्वरुप येईल. एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे सर्व निर्णय ते घेतील आणि आमच्या पक्षाचे निर्णय आम्ही घेऊ. त्यामुळे त्यांच्याबाबत मी काही सांगू शकत नाही”, असं अजित पवार यांनी म्हटलं.“मुख्यमंत्रिपदासाठी तुमचं नाव चर्चेत आहे? यावर प्रतिक्रिया विचारली असता अजित पवार म्हणाले, “कार्यकर्त्यांना काही वाटत असलं तरी शेवटी प्रत्येकाची संख्या किती आली? हे देखील पाहिलं जातं. मागच्या अडीच वर्षांची गोष्ट वेगळी होती. पण आताची गोष्ट वेगळी आहे”, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली.“आपण सर्वजण न्याय व्यवस्थेला महत्त्व देतो. आपण सर्वजण संविधानाच्या समोर नतमस्तक होतो. काल सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं की, प्रत्येक वेळेस निवडणुकीत ज्यांचा पराभव होतो, तो पराभव ईव्हीएमच्या माथी मारला जातो आणि यश आलं की मग ईव्हीएम चांगलं. लोकसभेच्या निवडणुकीवेळी देखील महायुतीचा अतिशय खराब परफॉर्मन्स पाहिला. मात्र, आम्ही त्यावेळी ईव्हीएमला दोष दिला नाही. काय असतं? कार्यकर्त्यांचं मनोधैर्य वाढवण्यासाठी आपले नेते काहीतरी करत आहेत हे दाखवावं लागतं. आता पश्चिम बंगाल, दिल्ली, केरळ, तेलंगणा या राज्यांचा निकाल लागला तेव्हा ईव्हीएम चांगलं. मात्र, निकाल विरोधात गेला की ईव्हीएम खराब”, असं म्हणत अजित पवारांनी विरोधकांवर हल्लाबोल केला.“आता आमची जबाबदारी वाढलेली आहे. आम्ही उद्या तिघेही दिल्लीत जाणार आहोत. त्यानंतर दिल्लीत पुढची चर्चा होईल. त्यानंतर एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री असं सरकार स्थापन होईल. आता काही दिवसांतच लगेच नागपूरच अधिवेशन आहे. त्यामुळे पुरवणी मागण्या मंजूर करुन घ्याव्या लागतील. कामाचा प्रेशर राहील. पण आम्ही अनुभवी असल्यामुळे काही अडचण येणार नाही. राज्याचा विकास करण्याचा प्रयत्न आमचा आहे. तसेच समाजातील सर्व घटकांना बरोबर नेण्याचा प्रयत्न आमचा आहे. केंद्र सरकारकडून राज्यासाठी निधी आणण्याचा प्रयत्नही आमचा आहे”, असं अजित पवार यांनी म्हटलं.“उद्या दिल्लीत गेल्यानंतर त्या ठिकाणी लोकसभेचं अधिवेशन सुरु आहे. त्यामुळे तिथे प्रमुखांना भेटण्याचाही प्रयत्न आमचा असेल. तसेच महायुतीच्या सरकार स्थापनेबाबतची चर्चा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात होईल. त्यामध्ये मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ असं ठरेल आणि त्याला अंतिम स्वरुप येईल. एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे सर्व निर्णय ते घेतील आणि आमच्या पक्षाचे निर्णय आम्ही घेऊ.

### पराभव ईव्हीएमच्या माथी मारला जातो

“मुख्यमंत्रिपदासाठी तुमचं नाव चर्चेत आहे? यावर प्रतिक्रिया विचारली असता अजित पवार म्हणाले,“कार्यकर्त्यांना काही वाटत असलं तरी शेवटी प्रत्येकाची संख्या किती आली? हे देखील पाहिलं जातं. मागच्या अडीच वर्षांची गोष्ट वेगळी होती. पण आताची गोष्ट वेगळी आहे”, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली.“आपण सर्वजण न्याय व्यवस्थेला महत्त्व देतो. आपण सर्वजण संविधानाच्या समोर नतमस्तक होतो. काल सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं की, प्रत्येक वेळेस निवडणुकीत ज्यांचा पराभव होतो, तो पराभव ईव्हीएमच्या माथी मारला जातो आणि यश आलं की मग ईव्हीएम चांगलं. लोकसभेच्या निवडणुकीवेळी देखील महायुतीचा अतिशय खराब परफॉर्मन्स पाहिला.

---

# “मी रडणारा नाही, तर मी लढणारा..”

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला

। सांगली । प्रतिनिधी
।महाईन्यूज।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातल्या पत्रकार परिषदेत सगळ्या पत्रकारांचं स्वागत केलं. निवडणुकीच्या निकालानंतर पहिल्यांदाच तुम्ही भेटत आहात. तुमच्या माध्यमांतून सगळ्या मतदारांचे आभार मानतो. हा जो विजय आम्हाला मिळाला तो अभूतपूर्व विजय आहे. गेल्या अनेक वर्षात असा निकाल जनतेने दिलेले नाही.**



एकीकडे विकासकामं केली, महाविकास आघाडीने थांबवलेली कामं आम्ही पुढे नेली असंही एकनाथ शिंदे म्हणाले. तसंच दुसरीकडे कल्याणकारी योजना राबवल्या. विकास आणि कल्याणकारी योजनांची सांगड आम्ही घातली असंही एकनाथ शिंदे म्हणाले.

यानंतर एकनाथ शिंदे यांनी त्यांची भूमिका मांडली एवढंच नाही तर उद्धव ठाकरेंना त्यांनी टोलाही लगावला.आम्ही बाळासाहेब ठाकरेंचे विचार घेऊन पुढे घेऊन गेलो. आनंद दिघे यांचे विचार घेऊन गेलो. आम्ही पर्वताप्रमाणे तुमच्या मागे उभे आहोत असं आम्हाला अमित शाह आणि नरेंद्र मोदी यांनी सांगितलं होतं.

आम्हाला त्यांनी मुख्यमंत्रिपद दिलं. मी त्या प्रत्येक दिवसाचा, क्षणाचा वापर राज्याच्या हितासाठी केला. मी मोदी आणि अमित शाह यांचे आभार मानतो. कारण त्यांचं पाठबळ लाभलं. या सगळ्या अडीच वर्षांच्या काळात प्रगतीचा वेग वाढला.आमच्या सरकारमध्ये जे निर्णय झाले ते आजवर आम्ही जे निर्णय घेतले ते रेकॉर्डब्रेक आहेत. पत्रकार असोत, शेतकरी असो, लाडक्या बहिणी असोत सगळ्यांचे प्रश्न आम्ही सोडवले. आमच्या काळात १२४ सिंचन प्रकल्प तयार झाले आहेत. या राज्याच्या प्रगतीचा वेग वाढला आहे.

### आम्ही घरी बसलो नाही

एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, “मी समाधानी आहे. लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ ही ओळख मला कुठल्याही पदापेक्षा मोठी आहे. मी नाराज वगैरे मुळीच नाही, मी रडणारा माणूस नाही तर लढणारा माणूस आहे. आम्ही सगळेच लढणारे आहोत, लढून काम करणारे लोक आहोत” असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आणि उद्धव ठाकरेंना टोला लगवाला. एकनाथ शिंदे म्हणाले, “आम्ही लोकांमध्ये गेलो, घरी बसलो नाही. आम्ही जे काम केलं ते मनापासून केलं. माझ्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी जनतेसाठी काम करत राहिन” असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.मी लोकप्रियता मिळवण्यासाठी किंवा कुठलंही मोजमाप व्हावं म्हणून मी काम केलं नाही.

# ‘माय पार्टी अँड माय फादर’!

## मिटकरी यांनी नरेश अरोरांवर संताप व्यक्त केला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

अजित पवार यांनी व त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मोठं यश मिळवलं आहे. या यशानंतर अनेकांनी अजित पवारांचं अभिनंदन केलं. दरम्यान, अजित पवारांचे माध्यम सल्लागार व अजित पवारांच्या प्रचाराचं काम करणाऱ्या डिझाइन्डबॉक्स या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक नरेश अरोरा यांनी देखील अजित पवारांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केलं. यावेळी अरोरा यांनी अजित पवारांच्या खांद्यावर हात ठेवून फोटो काढला. हा फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. हा फोटो पाहून राष्ट्रवादीचे विधान परिषद सदस्य अमोल मिटकरी यांनी नरेश अरोरांवर संताप व्यक्त केला होता.



### मिटकरी यांनी पोस्ट डिलीट केली

त्याने अनेकांचा अपमान केला. मी याबाबत पार्थ पवार व जय पवार यांच्याकडे तक्रार करणार आहे”. मात्र, मिटकरींनी तक्रार करण्यापूर्वीच पार्थ पवारांनी थेट मिटकरींना समज दिली आहे. नरेश अरोराने अजित पवारांच्या खांद्यावर हात ठेवून काढलेला फोटो समाजमाध्यमांवर पाहून मिटकरी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली होती. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं होतं की “विधानसभा निवडणुकीतील विजय हे अजित पवारांच्या मेहनतीचं फळ आहे. गुलाबी रंगाची कोणतीही जादू नव्हती. दादांच्या खांद्यावर हात पाहून मनाला वेदना झाल्या. माझ्यासारख्या बहुआयामी व्यक्तिमत्वाच्या खांद्यावर हात ठेवणाऱ्या दादांचा सैनिक हे माफ करणार नाही”. मात्र काही वेळाने मिटकरी यांनी ही पोस्ट एक्सवरून डिलीट केली.

“अरोराची अजित पवारांच्या खांद्यावर हात ठेवायची हिंमत कशी झाली?” अशा शब्दांत मिटकरींनी जाब विचारला. तसेच मिटकरी म्हणाले की “या अरोराने अजित पवारांच्या जुन्या सोशल मीडिया टीममधील मुलांना काढून स्वतःच्या लोकांची भरती केली. त्याने अनेकांचा अपमान केला. मी याबाबत पार्थ पवार व जय पवार यांच्याकडे तक्रार करणार आहे”. मात्र, मिटकरींनी तक्रार करण्यापूर्वीच पार्थ पवारांनी थेट मिटकरींना समज दिली आहे. नरेश अरोराने अजित पवारांच्या खांद्यावर हात ठेवून काढलेला फोटो समाजमाध्यमांवर पाहून मिटकरी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली होती. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं होतं की “विधानसभा निवडणुकीतील विजय हे अजित पवारांच्या मेहनतीचं फळ आहे. गुलाबी रंगाची कोणतीही जादू नव्हती. दादांच्या खांद्यावर हात पाहून मनाला वेदना झाल्या. माझ्यासारख्या बहुआयामी व्यक्तिमत्वाच्या खांद्यावर हात ठेवणाऱ्या दादांचा सैनिक हे माफ करणार नाही”. मात्र काही वेळाने मिटकरी यांनी ही पोस्ट एक्सवरून डिलीट केली.पक्षाने अशा प्रकारे अमोल मिटकरींना एकटं पाडल्यानंतर मिटकरी यांनी एक्सवर आणखी एक पोस्ट करून पक्षालाच सुनावलं. मिटकरी यांनी एक्सवर आणखी एक पोस्ट केली. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं, “हे पण तुम्ही आम्हाला सांगणार का? मी जे वक्तव्य डिझाईन बॉक्स संदर्भात केलं ते वक्तव्य म्हणजे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची प्रत्येकाचीच भावना आहे.आमचा साधा प्रश्न आहे,अजित पवारांच्या खांद्यावर हात ठेवण्याची हिंमत कशी केली? हा महाराष्ट्र आहे, चंदिगड नाही. याचूक कबूल करा. सॅलरी सोल्जर”.या सगळ्या घडामोडींनंतर आता अजित पवार यांचे पूत्र पार्थ पवार यांनी अमोल मिटकरींना समज दिली आहे. पार्थ पवारांनी समाजमाध्यमांवर एक पोस्ट केली आहे.

या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की अमोल मिटकरी यांनी पक्षाचे विधानपरिषदेचे सदस्य असूनही, DESIGNBOXED आणि नरेश अरोरा यांच्या संदर्भात पक्षविरोधी भूमिका घेतली आहे हे अत्यंत दुर्दैवी आहे. माझा पक्ष आणि माझे वडील, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार हे मिटकरी यांच्या वक्तव्यांशी कोणत्याही प्रकारे सहमत नाहीत. त्यांना अशा टिप्पण्या किंवा माध्यमांमध्ये वक्तव्ये करण्यापासून दूर राहण्याचे आवाहन करतो.“अरोराची अजित पवारांच्या खांद्यावर हात ठेवायची हिंमत कशी झाली?” अशा शब्दांत मिटकरींनी जाब विचारला. तसेच मिटकरी म्हणाले की “या अरोराने अजित पवारांच्या जुन्या सोशल मीडिया टीममधील मुलांना काढून स्वतःच्या लोकांची भरती केली.

## नवीन वर्षात सर्वनाश होणार!

### 2025 वर्षाबद्दल बाबा वेंगा यांनी केलेली भविष्यवाणी खूप भयानक

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

2025 वर्षाबद्दल बाबा वेंगा यांनी केलेली भविष्यवाणी खूप भयानक आहे. बाबा वेंगा यांची भविष्यवाणी जाणून घेण्यासाठी सगळेजण उत्सूक असतात. 2025 साठी बाबा वेंगा यांनी केलेली भविष्यवाणी भीतीदायक असून जगाचे टेन्शन वाढविणारी आहे. बाबा वेंगा यांच्या मते, 2025 मध्ये आपत्ती, अनेक विचित्र घटनेसह लोकसंख्या देखील कमी होवू शकते.



### अनेक भविष्यवाणी खऱ्या ठरल्या

पुढे असेही म्हटले आहे की, त्या काळात भू-राजनीतिक बदल देखील पाहायला मिळू शकतात. 2076 पर्यंत संपूर्ण जगात कम्युनिस्ट प्रशासनाच्या पुनरागमनाची शक्यता असेल, असे ही बाबा वेंगा यांनी सांगितले आहे.बाबा वेंगा यांनी अनेक भविष्यवाणी केलेल्या आहेत, ज्या आत्तापर्यंत खऱ्या ठरलेल्या आहेत. स्टॅलिनची मृत्यू, सोविएत संघाचे विभाजन, दुसरे महायुद्ध किंवा 2004 मधील त्सुनामी- सूनामीसह अनेक घटना बाबा वेंगा यांच्या भविष्यवाणीनुसार घडलेल्या आहेत.

2025 वर्षाबद्दल बाबा वेंगा यांच्या भविष्यवाण्या सगळ्यांचे टेन्शन वाढविणार आहे. बाबा वेंगा यांच्या मते, 2025 पासून अंतिम काळाची सुरुवात होणार आहे. 2025 मध्ये युरोपमध्ये एक भयंकर युद्ध सुरू होऊ शकते, ज्यामुळे मोठी आपत्ती येईल आणि त्यात जिवीतहानी सह मालमत्तेची हानी होऊ शकते. बाबा वेंगा यांच्या भविष्यवाणीनुसार, युरोपमधील युद्धामुळे संपूर्ण खंड नष्ट होऊ शकतो. हे युद्ध युरोपला संपूर्णपणे नष्ट करू शकते. या युद्धामुळे केवळ आर्थिक हानीच नाही, तर सामाजिक स्तरावरही मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे, ज्याचा दीर्घकाळ परिणाम राहू शकतो. वेंगा यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या विजयाबद्दलही वक्तव्य केलेले आहे. सर्व काही बर्फासारखे वितळून जाईल, फक्त एकच अपवाद असेल, व्लादिमीरचा गौरव, रशियाचा गौरव, या युद्धामुळे जागतिक पातळीवर सर्वनाश होण्याची शक्यता आहे.

बाबा वेंगा यांची एक आणखी भविष्यवाणी सध्या चर्चेचा विषय बनलेली आहे. बाबा वेंगा यांच्या मते, 2043 मध्ये युरोपमध्ये मुस्लिम प्रशासन असेल.

# नवी मुंबईची अंकिता दहिया ठरली 'यु.एम.बी.मिस इंडिया २०२४'!







येथे पार पडलेल्या यु. एम. बी. 'मिस इंडिया २०२४' या स्पर्धेत मुंबईची कु. अंकिता दहिया ही अजिंक्य ठरली आहे. अंकिता ही निवृत्त मरीन कमांडो दारासिंग दहिया यांची मुलगी आहे. ही स्पर्धा दिल्लीमध्ये इंदिरा गांधी स्टेडियमवर दि. १० नोव्हेंबररोजी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये ६५ स्पर्धक सहभागी झाले होते आणि ज्युरी म्हणजे परीक्षकांचे काम माजी मिस वर्ल्ड मनुश्री चिल्लर, सिने अभिनेता अर्जुन कपूर आणि सिने अभिनेत्री सारा खान यांनी केले. अंकिता दहिया हिने सुरुवातीच्या फेऱ्या यशस्वीपणे पार पाडत अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत तिला विचारण्यात आले की, तू मिस इंडिया झालीस, तर भारताची कोणती सांस्कृतिक आणि पारंपरिक गोष्ट जगामध्ये पोहोचवशील ? तिने स्पष्ट केले की मी शारीरिक तंदरुस्तीला अत्यंत महत्व देणाऱ्या एका कुटुंबाची सदस्य असून आपली पारंपारिक योगविद्या सर्व जगामध्ये पोहोचण्यासाठी प्रयत्न करेन. भारताचा सांस्कृतिक वसा आणि वारसा असलेली पुरातन मंदिरे जागतिक स्तरावर पोहोचावीत यासाठी मनापासून प्रयत्न करेन. अंकिता हिचे या उत्तुंग यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन आणि स्वागत होत आहे.

## हिना खानची आता परदेशातही हवा!

टिव्ही विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री हिना खान ही नेहमी चर्चेत असते. कधी व्यावसायिक कारणामुळे तर कधी वैयक्तिक कारणामुळे. ये रिश्ता क्या कहलाता या मालिकेतून हिनाला खरी प्रसिद्धी मिळाली. यानंतर ती बिग बॉसमध्येही दिसली. बिग बॉसमुळे तिला लोकप्रियता मिळाली. टीव्हीपासून सुरुवात करत हिनाने बॉलिवूड अन् आता हॉलिवूडपर्यंत मजल मारली आहे. आता हिना तिच्या अभिनयाची जादू परदेशात दाखवण्यासाठी सज्ज झाली आहे. हिना खानचा चित्रपट द कंट्री ऑफ ब्लाइंडला ऑस्कर 2024 साठी नामांकन मिळाले आहे. द कंट्री ऑफ ब्लाइंड हा चित्रपट एचजी वेल्सच्या कादंबरीवर आधारित आहे. या चित्रपटाला IMDB ने या 8.5 रेटिंग दिले होते. ना खानच्या या चित्रपटाला मिळालेल्या प्रतिसादानंतर तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## दियाचे आडनाव मिर्झा कसे?

अभिनेत्री दिया मिर्झा हे नाव आता जारी चर्चेत नसलं किंवा चित्रपटातून झळकत नसलं तरी एक काळ असा होता की तेव्हा दियाची फक्त जादूच नव्हती तर दियासाठी लोक अक्षरशः वेडे होते. अशा दियाचा आज 42 वा वाढदिवस.. त्यानिमित्ताने जाणून घेऊया तिच्या खासगी आयुष्याविषयी काही खास बात.. दिया आज ४१ वर्षांची झाली तरी तिचे सौन्दर्य आजही तसेच आहे. किंबहुना आजही तिचे लाखों चाहते रोज तिला फॉलो करत असतात. पण दिया मुसलमान नसूनही तिचे नाव मिर्झा कसे? असा प्रश्न अनेकांना पडला असेल. पण त्यामागे एक मोठे कारण आहे. दियाचा जन्म 9 डिसेंबर 1981 रोजी हैदराबादमध्ये झाला. दियाच्या आई दीपा या बंगाली हिंदू आहेत. तर तिचे वडील फ्रँक हेड्रिच ही जर्मन वंशांचे आहेत. ती चार वर्षांची असताना तिच्या आई-वडिलांनी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दियाला घेऊन तिची आई विभक्त झाली. पुढे दियाच्या आईने हैदराबादचे अहमद मिर्झा यांच्यासोबत लग्न केले. पण अहमद मिर्झा यांनी केवळ दियाच्या आईला स्वीकारले नाही, तर दियाला मुलगी म्हणून दत्तक घेतले. म्हणूनच दियाचे आडनाव मिर्झा असे आहे. त्यामुळे दियाचे सर्व शिक्षण हैदराबादमध्ये झाले आहे. कॉलेजमध्ये असतानाच तिने स्वतःच्या पायावर उभं राहायला सुरुवात केली. सुरुवातीला ती एका मीडिया फर्ममध्ये मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह होती. यादरम्यान तिनं लिप्टन, वॉल्स आईस्क्रीम, इमामी आणि इतर कंपन्यांसह सर्व मोठ्या कंपन्यांकडून मॉडेलिंगची ऑफर मिळू लागली. दिया मिर्झाने 2000 साली फेमिना मिस इंडिया या सौंदर्य स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेत ती सेकंड रनर अप ठरली. 2000 मध्ये वयाच्या 19 व्या वर्षी



## दिशाच्या बहिणीने शेअर केले फोटो

आपल्या फॅशन व बोल्डनेसमुळे लोकप्रिय असलेली अभिनेत्री दिशा पाटनी (DISHA PATANI) हिला खुशबू नावाची मोठी बहीण आहे. दिशा फॅशनच्या दुनियेत सक्रिय आहे, तर तिची बहीण खुशबू पाटनी ही भारतीय सैन्यात अधिकारी राहिली आहे. स्वातंत्र्यदिन अवघ्या दोन आठवड्यांवर आहे, अशातच खुशबूने तिचे काही जुने फोटो शेअर केले आहेत. भारतीय सैन्यात लेफ्टनंट राहिलेली खुशबू आता न्यूट्रिशनिस्ट, फिटनेस ट्रेनर व टॅरो कार्ड रीडर आहे. ती इन्स्टाग्रामवर लोकांना फिटने टिप्स देते. याशिवाय ती उत्तम डान्सही करते. खुशबू सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. तिचे इन्स्टाग्रामवर जवळपास सात लाख फॉलोअर्स आहेत. खुशबू दिसायला बहीण दिशासाखीच सुंदर आहे.खुशबूने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर १० फोटो शेअर केले आहेत. खुशबूने ती सैन्यात असतानाचे काही फोटो शेअर केले आहेत. यातील काही फोटो वसतीगृहातील आहेत, तर काही ट्रेनिंगचे आहेत. काही फोटोंमध्ये खुशबू लष्करी गणवेशात दिसत आहे. तिचे हे फोटो पाहून चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. 'सैन्यात येण्यासाठी इच्छुक उमेदवारांसाठी हे फोटो खूप प्रेरणादायी आहेत,' अशी कमेंट एका युजरने केली आहे.'तरुण पिढीसाठी खरी प्रेरणा,' 'किती सुंदर प्रवास!

# बुमराह नंबर वन कसोटी गोलंदाज!

## यशस्वी जैस्वालची कारकिर्दीतील उत्कृष्ट रँकिंग

नवी दिल्ली । वृत्तसंस्था







**भारत वि ऑस्ट्रेलियामधील पहिल्या कसोटीनंतर आयसीसीने नवी कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. यामध्ये भारतीय खेळाडूंनी आपल्या क्रमांकाने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. गोलंदाजीत जसप्रीत बुमराह पुन्हा एकदा नंबर १ कसोटी गोलंदाज ठरला आहे. पर्थ कसोटीत चमकदार कामगिरी करत त्याने दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाला मागे टाकलं आहे. बॉर्डर गावस्कर मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताच्या २९५ धावांनी दणदणीत विजय मिळवताना बुमराहने आठ विकेट्स घेतल्या आणि सामनावीराचा पुरस्कार जिंकला.**

बुमराहने या कामगिरीच्या जोरावर कसोटी क्रमवारीत दोन स्थानांनी झेप घेतली आणि दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा आणि ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड यांना मागे टाकून कसोटी क्रिकेटमधील अव्वल क्रमांकाचा गोलंदाज म्हणून आपले स्थान पुन्हा मिळवले.इंग्लंडविरुद्ध या वर्षी फेब्रुवारीमध्ये नऊ विकेट घेत बुमराहने प्रथमच अव्वल स्थान गाठले आणि त्यानंतर ऑक्टोबरमध्ये बांगलादेशविरुद्धच्या मालिकेनंतर त्याने पुन्हा अव्वल स्थान गाठले. मात्र यानंतर रबाडाने त्याला मागे टाकलं होतं. बुमराहशिवाय त्याचा मोहम्मद सिराजनेही क्रमवारीत सुधारणा केली आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पर्थ कसोटीत त्याने पाच विकेट्स घेतल्या होत्या. ज्याच्या जोरावर त्याने तीन स्थानांची सुधारणा करत २५वे स्थान गाठले आहे.भारतीय क्रिकेट संघाचा युवा सलामीवीर यशस्वी जैस्वाल आयसीसीच्या कसोटी फलंदाजांच्या क्रमवारीत सर्वात मोठी झेप घेतली आहे. यशस्वी जैस्वालने पर्थ कसोटीतील शतकानंतर आयसीसी रँकिंगमध्ये दुसऱ्या स्थानी झेप घेतली आहे. आयसीसी रँकिंगमध्ये पहिल्या स्थानी जो रूट ९०३ गुणांसह पहिल्या स्थानी आहे. तर १६१ धावांच्या खेळीनंतर ८२५ गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे. यशस्वी जैस्वालच्या छोट्याश्या कारकिर्दीतील ही सर्वात मोठी रँकिंग मिळवली आहे.यशस्वी जैस्वाल दुसऱ्या स्थानी गेल्याने न्यूझीलंडच्या केन विल्यमसनला एका स्थानाचा तोटा झाला आहे. तो आता ८०४ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. तर इंग्लंडचा हॅरी ब्रुक तिसऱ्या स्थानावरून चौथ्या स्थानी पोहोचला आहे. कसोटी फलंदाजांच्या यादीत विराटला एका शतकासह ९ स्थानांनी झेप घेतली आहे. विराट कोहली आता ६८९ गुणांसह १३व्या स्थानी पोहोचला आहे. ऋषभ पंत या क्रमवारीत सहाव्या स्थानी आहे, पंतने आपले सहावे स्थान कायम राखले आहे.बुमराहने या कामगिरीच्या जोरावर कसोटी क्रमवारीत दोन स्थानांनी झेप घेतली आणि दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा आणि ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड यांना मागे टाकून कसोटी क्रिकेटमधील अव्वल क्रमांकाचा गोलंदाज म्हणून आपले स्थान पुन्हा मिळवले.इंग्लंडविरुद्ध या वर्षी फेब्रुवारीमध्ये नऊ विकेट घेत बुमराहने प्रथमच अव्वल स्थान गाठले आणि त्यानंतर ऑक्टोबरमध्ये बांगलादेशविरुद्धच्या मालिकेनंतर त्याने पुन्हा अव्वल स्थान गाठले. मात्र यानंतर रबाडाने त्याला मागे टाकलं होतं. बुमराहशिवाय त्याचा मोहम्मद सिराजनेही क्रमवारीत सुधारणा केली आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पर्थ कसोटीत त्याने पाच विकेट्स घेतल्या होत्या. ज्याच्या जोरावर त्याने तीन स्थानांची सुधारणा करत २५वे स्थान गाठले आहे.भारतीय क्रिकेट संघाचा युवा सलामीवीर यशस्वी जैस्वाल आयसीसीच्या कसोटी फलंदाजांच्या क्रमवारीत सर्वात मोठी झेप घेतली आहे. यशस्वी जैस्वालने पर्थ कसोटीतील शतकानंतर आयसीसी रँकिंगमध्ये दुसऱ्या स्थानी झेप घेतली आहे. आयसीसी रँकिंगमध्ये पहिल्या स्थानी जो रूट ९०३ गुणांसह पहिल्या स्थानी आहे. तर १६१ धावांच्या खेळीनंतर ८२५ गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे. यशस्वी जैस्वालच्या छोट्याश्या कारकिर्दीतील ही सर्वात मोठी रँकिंग मिळवली आहे.

### बुमराह पुन्हा एकदा नंबर 1

यशस्वी जैस्वाल दुसऱ्या स्थानी गेल्याने न्यूझीलंडच्या केन विल्यमसनला एका स्थानाचा तोटा झाला आहे. तो आता ८०४ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. तर इंग्लंडचा हॅरी ब्रुक तिसऱ्या स्थानावरून चौथ्या स्थानी पोहोचला आहे. कसोटी फलंदाजांच्या यादीत विराटला एका शतकासह ९ स्थानांनी झेप घेतली आहे. विराट कोहली आता ६८९ गुणांसह १३व्या स्थानी पोहोचला आहे. ऋषभ पंत या क्रमवारीत सहाव्या स्थानी आहे, पंतने आपले सहावे स्थान कायम राखले आहे.भारत वि ऑस्ट्रेलियामधील पहिल्या कसोटीनंतर आयसीसीने नवी कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. यामध्ये भारतीय खेळाडूंनी आपल्या क्रमांकाने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. गोलंदाजीत जसप्रीत बुमराह पुन्हा एकदा नंबर १ कसोटी गोलंदाज ठरला आहे.

# गुकेशने डिंगला बरोबरीत रोखले!

## दुसऱ्या डावात काळ्या मोहऱ्यांनी अर्ध्या गुणाची कमाई

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज




**भारताचा ग्रँडमास्टर दोम्माराजू गुकेशने जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ लढतीमधील मंगळवारी झालेल्या दुसऱ्या डावात गतविजेत्या डिंग लिरेनला बरोबरीत रोखले. काळ्या मोहऱ्यांनी खेळताना गुकेशने अर्ध्या गुणाची कमाई केली. १४ डावांच्या या लढतीत सोमवारी झालेल्या पहिल्या डावात लिरेनने विजय मिळविला होता. त्यामुळे आता दोन डावांनंतर लिरेन १.५-०.५ असा आघाडीवर आहे.**

“जागतिक अजिंक्यपद लढतीत काळ्या मोहऱ्यांसह डाव बरोबरीत सोडवणे कधीही चांगले असते. ही लढत अद्याप सुरुवातीच्या टप्प्यात आहे. आम्हा दोघांकडेही अजून खूप वेळ आहे,” असे गुकेश दुसऱ्या डावानंतर म्हणाला. जगज्जेतेपदाच्या लढतीत १८ वर्षीय गुकेश सर्वांत युवा आव्हानवीर आहे. पहिल्या डावात चांगल्या सुरुवातीनंतर गुकेश पटावर चाली रचताना संघर्ष करताना दिसून आला होता. मात्र, दुसऱ्या डावात गुकेशने आपल्या चुका सुधारल्या. दुसरीकडे, पहिल्या डावातील विजयानंतर लिरेनने लगेच आक्रमक चाली रचणे विचारपूर्वक टाळले. फार धोका न पत्करता लिरेनने आपल्या चाली खेळल्या. गुकेशने २३व्या चालीनंतरच बरोबरीचा प्रस्ताव मान्य केला. लिरेनने गेल्या वर्षी प्रतिस्पर्धी इयन नेपोम्नियाशीविरुद्ध तीन वेळा पिछाडीनंतर बाजी मारली होती. त्यामुळे गुकेशलाही मुसंडी मारण्याची संधी आहे. “जागतिक अजिंक्यपद लढत खेळणाऱ्या प्रत्येक खेळाडूवर दडपण असणे स्वाभाविक आहे. आम्हीही याला अपवाद नाही. मी या लढतीकडे एक आव्हान म्हणून बघत आहे.

### मी फार काही वेगळे प्रयत्न केले नाहीत

एका वेळेस एका डावाचा विचार करण्याकडे माझा कल आहे,” असे दुसऱ्या डावानंतर गुकेशने सांगितले. “पहिल्या डावात मी काही तरी नवीन खेळलो. त्यासाठी दृढ स्मरणशक्ती आवश्यक आहे. दुसऱ्या डावात मी फार काही वेगळे प्रयत्न केले नाहीत. आता तिसरा डाव मोठा असेल. गुकेश एक गुणाने पिछाडीवर आहे. त्याला पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळण्याची संधी मिळेल. मात्र, मी आव्हानासाठी सज्ज आहे,” असे दुसऱ्या डावानंतर लिरेन म्हणाला.